MHBU190000792010

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०२/०१/२०१० |
| नोंदणी दिनांक | : | ०२/०१/२०१० |
| निकाल दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | १६ ०२ ०९ |

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र.XXXII प्रमाणे**

**भाग–'अ'**

**(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I)]

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदखेड राजा यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्री. सतिश ग. शिंदे)**
**निकाल तारीख ११/०३/२०२६**
**नियमीत फौजदारी खटला क्र.०२/२०१०**
**सीएनआर क्र. एमएचबीयु १९००००७९२०१०**
**(अपराध क्र.८१/२००९, किनगांव राजा पोलीस ठाणे,**
**ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा)**
**नि.क्र.१०३**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र राज्य,<br>तर्फे ठाणे अधिकारी,<br>किनगांव राजा पोलीस ठाणे,<br>ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा. |
| **सरकार तर्फे विशेष सरकारी अभियोक्ता** | | श्री. जे.आय. लाहोरे |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | १.<br><br>२.<br>३. | ज्ञानेश्वर गोविंदा कायंदे,<br>वय–४५ वर्ष, व्यवसाय–शेती,<br>गोविंदा तुकाराम कायंदे **(मयत)**,<br>कुशीवर्ता गोविंद कायंदे **(मयत)**,<br>रा.किनगाव राजा, ता. सिंदखेड राजा,<br>जि. बुलढाणा. |
| **आरोपींतर्फे विद्वान वकील** | | श्री. आर.एन. मेहत्रे |

**भाग–'ब'**

**[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २३/०९/२००९ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | ०३/११/२००९ |
| दोषारोप–पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०२/०१/२०१० |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०५/०७/२०१९ |
| पुरावा आरंभ झाल्याचा दिनांक | १५/०४/२०२४ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता राखून ठेवल्याचा दिनांक | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ११/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | – |

**आरोपींचा तपशील**

| अ. क्र. | आरोपींची नांवे | अटक केलयाचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | दोषारोपामधील कलमे | दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर गोविंद कायंदे, | १०/११/२००९ | १०/११/२००९ | भा.दं.वि. कलम ३२५, ५०४, ५०६ | निर्दोष मुक्त | — | — |
| २. | गोविंदा तुकाराम कायंदे, | | | | | | |
| ३. | कुशिवर्ता गोविंदा कायंदे, | | | | | | |

## भाग–'क'

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ) अभियोग पक्ष :–

| स्थान | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | प्रकाश नामदेव काकड | ५१ | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.२ | गणेश गोविंदराव डोळे | ६५ खाली | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.३ | प्रकाश गंगाराम झोरे | ८१ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.४. | ज्ञानेश्वर किशन चाटे | ८३ | तक्रारदार |

ब) बचाव पक्ष, असल्यास :–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची/निशाणींची यादी

अ) अभियोग पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | ८४ | तोंडी तक्रार |
| २. | ८५ | प्रथम खबरी अहवाल |
| ३. | ५२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील स्वाक्षरी |
| ४. | ९४ व ९५ | मेडीकल सर्टिफिकेट |

ब) बचाव पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

**क) न्यायालयीन :–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

**ड) भौतिक वस्तु :–**

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | एक ओबडधोबड दगड | – |

**न्यायनिर्णय**

(घोषित दिनांक ११/०३/२०२६)

**१]** आरोपीची प्रस्तुत खटल्याद्वारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ५०४, ५०६ अन्वये संपरीक्षा करण्यात येत आहे.

**<u>तक्रारीतील अभिकथीत तथ्यः–</u>**

**२]** तक्रारदार नामे ज्ञानेश्वर किशन चाटे यांनी दि. २३/०९/२००९ रोजी पोलीस स्टेशन किनगाव राजा येथे तोंडी तक्रार दिली होती. त्यांनी तोंडी तक्रारीमध्ये असे नमूद केले आहे की, दिनांक २३/०९/२००९ रोजी दुपारी ०२.०० वाजताच्या दरम्यान तक्रारदार त्यांच्या शेतातील मारोतीचे दर्शन घेत असतांना त्यांचे शेतशेजारी गोविंदा तुकाराम कायंदे हे त्यांचे जवळ आले व त्यांना म्हणाले की, '*तु जर किशन चाटेच्या पोटचा असशील तर नदीवरील डोहावर इंजिन मांडशील*' असे म्हणुन त्याने तक्रारदार यांना शिवीगाळ केली व तेथुन

निघुन गेला. त्यानंतर तक्रारदार हे त्यांचे जवळील इंजिन पऱ्हाटीला पाणी देण्यासाठी नदीवर घेऊन गेले, नदीवर पाण्याचे इंजिन फिट करित असतांना गोविंदराव तुकाराम कायंदे हा आला व त्यांने तक्रारदार यांना शिवीगाळ करून म्हणाला की, '*तु इथे इंजिन मांडु नको, हे शेत तुमचे नाही हे शेत काकडे पांडेबुवा यांचे आहे*'. तेथुन तो त्यांचे शेताकडे पळत जाऊन त्याची बहिण शांताबाई, त्याचा पुतण्या इंदर कायंदे आणि कामावरील माणुसे जाधव व बद्री डोईफोडे असे लोक जमा झाले, त्या सर्व लोकांनी तडजोड करून सदर इंजिन हे येथे न मांडता दुसऱ्या ठिकाणी मांडा असा समाझोता केला. तक्रारदार हे इंजिन दुसऱ्या ठिकाणी मांडु लागले त्यावेळी गोविंदराव कांयदे यांनी घरून त्यांचे मुलाला व पत्नीला बोलावुन आणले ते तेथे आल्यानंतर त्यांनी तक्रारदार यांच्या सोबत भांडण सुरू केले व भांडणा दरम्यान तक्रारदार यांना कुऱ्हाड फेकुन मारली तक्रारदार यांनी ती कुऱ्हाड हुकवली, तसेच तक्रारदार यांच्या सोबत असलेली तिन माणसे गणेश डोळे, लक्ष्मण गोरे व नामदेव काकड यांना दगड फेकुन मारले व त्यांना असे म्हणाला की, '*येथुन निघुन जा मला ज्ञानेश्वर चाटेचा खुन करायचा आहे तो माझ्या बापाला गोविंद्या म्हणाला*'. भांडणा दरम्यान ज्ञानेश्वर कायंदे यांनी १० ते १२ वेळेस दगड हातात घेऊन तक्रारदार यांच्या पाठीवर मारून तक्रारदार यांना काट्यात लोटुन दिले व खुन करण्याच्या धमक्या दिल्या. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना असे म्हटले की, '*तु जर पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्याकरीता गेला तर तुझा एखाद्या दिवशी खुन करून टाकीन, पोलीस माझ्या हाताखालचे आहेत*' अशी धमकी दिली. वर नमूद तक्रारीअन्वये ठाणे अधिकारी किनगांव राजा यांनी अपराध क्र.८१/२००९ हा भारतीय दंड विधानाचे गुन्हा कलम ३२५, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये नोंदविला.

**<u>अपराधाचे अन्वेशनः–</u>**

३]     प्रस्तुत प्रकरणाचा तपास ना.पो.का. श्री. नारायण गिते

(ब.क्र.१०६०) यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीला अटक केली. आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १७३ अन्वये अंतिम अहवाल सादर केला.

## दोषारोप व संपरीक्षा :–

४] माझे पूर्व पीठासीन अधिकारी यांनी, आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ५०४, ५०६ अन्वये (**नि.क्र.३६**) खाली दि.०५/०७/२०१९ रोजी दोषरोप निश्चीत केला. दोषारोपातील मजकूर आरोपीला त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे प्रतिकथने **(नि.क्र.३७)** लगत केले. आरोपीने गुन्हा कबुल न केल्यामुळे, अभियोग पक्षाने आरोपीविरूद्ध दोषारोपात नमूद अपराध सिद्ध करण्याकरीता अनुसूची–अ प्रमाणे साक्षीदार तपासले आणि अनुसूची–क प्रमाणे कागदपत्रे सिद्ध केली.

५] आरोपीविरूद्ध अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यात, गुन्ह्यात गोवणाऱ्या परिस्थितीजन्य विषयांचा पुरावा दिसून आल्यामुळे, आरोपी यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये साक्ष तपासणी अनुक्रमे **(नि.क्र.९६)** अन्वये घेण्यात आलेली आहे.

६] अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्री. जे.आय. लाहोरे व आरोपी यांचे विद्वान अभियोक्ता श्री. आर.एन. मेहत्रे यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर उपलब्ध असलेले कागदपत्र व पुरावा यांचे निरीक्षण केले असता, न्यायनिर्णयाप्रत येण्यासाठी माझ्यासमोर खालील विचाराधीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेह मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| अ.क्र | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि.२३/०९/२००९ रोजी दुपारी ०२.०० वाजता मौजे किनगाव राजा शिवारात आरोपीने काट्यात ढकलून देऊन त्याला इच्छापूर्वक जबर दुखापत पोहचविली व त्यायोगे आरोपीने भा.दं.वि. कलम ३२५ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| (२) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने तक्रारदार यांचा अपमान करून त्यायोगे तिला प्रक्षोभित केले ज्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा गुन्हा घडावा असा आरोपीचा उद्देश होता व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| (३) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फौजदारीपात्र धाकदपटशा दाखवून तक्रारदार यांना जीवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि. कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| (४) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– कारणमिकांसा –**

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ३ बाबत :–</u>**

**७]** कोणत्याही संपरीक्षेमध्ये यशस्वी होण्याकरीता अभियोग पक्षाला दोषारोपात नमुद गुन्हा ज्या–ज्या घटकांनी बनलेला असतो, तो प्रत्येक घटक

समाधानकारक, विश्वासदर्शक पुराव्याआधारे सिद्ध करावा लागतो. अभियोग पक्षाला आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करतांना तो संशयापलीकडे जावून सिद्ध करावा लागतो. अर्थातच, गुन्हा सिद्ध करताना सरकारी पक्षाने ही काळजी घेणे आवश्यक आहे की, त्यांचे साक्षीदार हे विश्वासपात्र असावेत. अपराधाच्या महत्त्वपूर्ण कथनांच्या बाबतीत साक्षीदारांच्या पुराव्यात सुसंगतपणा असायला हवा. साक्षीदारांच्या विश्वासार्हतेबाबत साशंकता निर्माण झाल्यास, परिणामी आरोपी यांना संशयाचा फायदा द्यावा लागेल.

८] **प्रकाश नामदेव काकड (सा.क्र.१)** हे प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंच असल्याचे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते, त्यांनी शपथेवरील पुराव्यात असे कथन केले आहे की, दि. ०४/११/२००९ रोजी पोलिसांनी त्यांना घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता कुठेही बोलाविले नव्हते. पोलिसांनी त्यांची एका लिहिलेल्या कागदावर मारुती मंदिराजवळ सही घेतली होती. घटनास्थळ पंचनाम्यात काय नमूद केले आहे, हे त्यांना माहिती नाही. पुराव्यादरम्यान त्यांना घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर त्यांची स्वाक्षरी आहे. स्वाक्षरीला **(नि.क्र.५२)** देण्यात आला. प्रकाश काकड यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे विशेष सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासनीत विचारली जाणारी सुचक प्रश्न विचारले. परंतु, सुचक प्रश्नांचे उत्तर देतांना देखील त्यांनी आरोपीविरूद्ध कोणताही आरोपसदृश्य विधाने केली नाहीत.

९] **गणेश गोविंदराव डोळे (सा.क्र.२)** हे प्रस्तुत प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते, त्यांनी शपथेवरील पुराव्यात असे कथन केले आहे की, ते न्यायालयात बसलेल्या आरोपीला ओळखतात, तसेच ते तक्रारदार नामे ज्ञानेश्वर चाटे यांना देखील ओळखतात. तक्रारदार आणि आरोपी यांच्या दरम्यान १६ वर्षापूर्वी कोणती घटना घडली होती, याबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही. पोलिसांनी सदर घटनेबाबत

त्यांची चौकशी करून जबाब घेतलेला नव्हता. गणेश डोळे यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे विशेष सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासनीत विचारली जाणारी सुचक प्रश्न विचारले. परंतु, सुचक प्रश्नांचे उत्तर देतांना देखील त्यांनी आरोपीविरूद्ध कोणताही आरोपसदृश्य विधाने केली नाहीत.

१०]　　**प्रकाश गंगाराम झोरे (सा.क्र.३)** हे प्रस्तुत प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते, त्यांनी शपथेवरील पुराव्यात असे कथन केले आहे की, ते तक्रारदार ज्ञानेश्वर चाटे व आरोपी यांना ओळखतात, कारण ते दोघेही त्यांच्या गावचे रहिवासी आहेत. तक्रारदार व आरोपी यांच्यादरम्यान घटना किती वर्षांपूर्वी घडली होती, हे त्यांना माहिती नाही. पोलिसांनी घटनेबाबत त्यांची कोणतीही चौकशी करून जबाब घेतलेला नव्हता. प्रकाश गंगाराम झोरे यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे विशेष सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासनीत विचारली जाणारी सुचक प्रश्न विचारले. परंतु, सुचक प्रश्नांचे उत्तर देतांना देखील त्यांनी आरोपीविरूद्ध कोणताही आरोपसदृश्य विधाने केली नाहीत.

११]　　**ज्ञानेश्वर किशन चाटे (सा.क्र.४)** प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार असल्याचे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते. त्यांनी शपथेवरील पुराव्यात आरोपींना ओळखत असल्याचे नमूद केले असून, किनगाव राजा शिवारातील गट क्र. ४५५ मध्ये सुमारे ११ एकर सामायिक शेती असल्याचे सांगितले आहे. दिनांक २३/०९/२००९ रोजी दुपारी सुमारे २.०० वाजण्याच्या सुमारास, किनगाव राजा येथील नदीवरील डोहाजवळ घटना घडली. त्या वेळी आरोपी ज्ञानेश्वर कायंदे, गोविंदराव कायंदे व कुशवर्ता कायंदे तेथे आले होते. आरोपी गोविंदराव कायंदे यांनी तक्रारदारास इंजिन ठेवण्यावरून वाद घालत अपमानास्पद शब्द वापरले. त्यानंतर तक्रारदार काकडे पांडेबुवा यांच्या शेतातील डोहावर इंजिन ठेवत असताना आरोपी पुन्हा तेथे येऊन वाद घातला. पुढे आरोपी गोविंदराव कायंदे

यांनी इतर व्यक्तींना बोलावून आणले व समजुतीने तक्रारदाराने इंजिन दुसऱ्या ठिकाणी ठेवण्यास मान्यता दिली. मात्र, त्यानंतर आरोपी ज्ञानेश्वर कायंदे व कुशवर्ता कायंदे घटनास्थळी येऊन तक्रारदारावर हल्ला केला. आरोपी ज्ञानेश्वर कायंदे यांनी कुऱ्हाड फेकून मारण्याचा प्रयत्न केला तसेच दगडफेक केली व जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपी गोविंदराव कायंदे व कुशवर्ता कायंदे यांनी तक्रारदाराचे हात धरले असताना आरोपी ज्ञानेश्वर कायंदे यांनी त्यांना मारहाण करून काट्यांत ढकलून दिले. सदर मारहाणीत वापरलेला दगड (मुद्देमाल प्रॉपर्टी क्र. १५/२०१०) न्यायालयात आर्टिकल म्हणून दाखल करण्यात आलेला आहे. घटनेनंतर तक्रारदाराने पोलीस ठाणे किनगाव राजा येथे तक्रार दिली असून, तोंडी तक्रार व प्रथम खबरी अहवालावरील स्वाक्षरी त्यांची असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. सदर दस्तऐवजांना अनुक्रमे **(नि. क्र. ८४ व ८५)** देण्यात आले आहेत.

**१२]** अभिलेखाची सखोल पाहणी केली असता असे स्पष्टपणे निदर्शनास येते की, तक्रारदार ज्ञानेश्वर चाटे व आरोपी यांच्यामध्ये खटला प्रलंबित असताना परस्पर सामज्यासाने तडजोड झालेली आहे. सदर तडजोडीच्या अनुषंगाने, तक्रारदार व आरोपी यांनी प्रस्तुत प्रकरण तडजोडीच्या आधारे निकाली काढण्याकरिता **(नि. क्र. ९१)** खाली अर्ज सादर केलेला आहे. यावरून दोन्ही पक्षांनी परस्पर वाद मिटवून प्रकरण समाप्त करण्याची इच्छा व्यक्त केलेली असल्याचे दिसून येते. भारतीय दंड विधानाचे कलम ३२५ अन्वये असलेला गुन्हा हा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३२० अंतर्गत तडजोडपात्र गुन्हा आहे. सदर तरतुदीनुसार, ज्या व्यक्तीस गंभीर दुखापत झालेली आहे, त्या व्यक्तीसोबत तडजोड करून गुन्हा निकाली काढता येतो. तसेच, भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ हा गुन्हादेखील तडजोडीद्वारे निकाली काढण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार व आरोपी यांच्यात झालेली तडजोड, तसेच त्यासंदर्भातील अर्ज यांचा विचार करता, आरोपीस भारतीय दंड विधानाचे कलम

३२५ व ५०४ अन्वये, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० (८) प्रमाणे निर्दोष मुक्तता देणे कायदेशीरदृष्ट्या योग्य व ग्राह्य ठरते.

**१३]** मात्र, भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ भाग–२ अन्वये असलेला गुन्हा हा तडजोडीद्वारे निकाली काढण्याजोगा नाही. त्यामुळे, इतर कलमांबाबत तडजोड ग्राह्य धरली गेली असली तरी, कलम ५०६ संदर्भात आरोपीचा दोष स्वतंत्रपणे परीक्षणास घेणे आवश्यक ठरते. प्रस्तुत प्रकरणात विचारार्थ मुद्दा असा निर्माण होतो की, आरोपीने तक्रारदारास जीवे मारण्याची धमकी दिली होती का, आणि असल्यास ती कायद्याच्या कसोटीवर सिद्ध होते का. तक्रारदार ज्ञानेश्वर चाटे यांनी शपथेवरील पुराव्यात असे नमूद केले आहे की, आरोपीने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. तथापि, फौजदारी न्यायशास्त्रातील मूलभूत तत्वानुसार, केवळ एकतर्फी तोंडी साक्ष पुरेशी नसून, ती विश्वासार्ह, सुसंगत व स्वतंत्र पुराव्यांनी पुष्टी झालेली असणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात, तक्रारदाराच्या या साक्षीस घटनास्थळी उपस्थित असलेल्या इतर साक्षीदार नामे प्रकाश काकड (सा.क्र.१) , गणेश डोळे (सा.क्र.२) व प्रकाश झोरे (सा.क्र.३) यांनी कोणतीही ठोस व सुसंगत पुष्टी दिलेली नाही.

**१४]** त्यामुळे, तक्रारदाराने नमूद केलेल्या कथित धमकीबाबत शंका निर्माण होते. आरोपीने प्रत्यक्षात तक्रारदारास जीवे मारण्याची धमकी दिली होती का, याबाबत निश्चित निष्कर्ष काढण्यासाठी आवश्यक असलेली ठोस व स्वतंत्र साक्ष उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत, तक्रारदाराच्या साक्षीकडे सावधगिरीने पाहणे आवश्यक ठरते. याशिवाय, अभिलेखावरून असेही स्पष्ट होते की, तक्रारदार व आरोपी यांच्यामध्ये इंजिन टेकविण्याच्या कारणावरून वाद निर्माण झालेला होता. अशा वादातून परस्पर वैमनस्य निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, तक्रारदाराने आरोपीविरुद्ध तक्रार दाखल करण्यामागे वैयक्तिक वादाची पार्श्वभूमी असण्याची शक्यता संभवते. त्यामुळे तक्रारदाराच्या

साक्षीची स्वतंत्र पुष्टी अभावाने अधिकच महत्त्वाची ठरते. फौजदारी न्यायप्रणालीत “शंका पलीकडे दोष सिद्ध करणे” ही अत्यंत महत्त्वाची कसोटी आहे. जर पुराव्यांमधून शंका निर्माण होत असेल, तर त्या शंकेचा लाभ आरोपीस देणे हा न्यायाचा मूलभूत सिद्धांत आहे. प्रस्तुत प्रकरणात, तक्रारदाराच्या साक्षीस स्वतंत्र साक्षीदारांची पुष्टी नसल्यामुळे, तसेच घटनेच्या पार्श्वभूमीवरून वादग्रस्त परिस्थिती अस्तित्वात असल्यामुळे, आरोपीविरुद्ध कलम ५०६ (भाग–२) अन्वये दोष शंका पलीकडे सिद्ध झालेला नाही.

**१५]** तसेच, कथित धमकीचे स्वरूप, तिची तीव्रता, व त्यातून तक्रारदारामध्ये निर्माण झालेली भीती याबाबतही ठोस व विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. परिणामी, भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ (भाग–२) अंतर्गत आवश्यक घटक सिद्ध होत नाहीत. वरील सर्व बाबींचा सखोल व एकत्रित विचार करता, न्यायालयाचे असे मत होते की, आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ (भाग–२) अन्वये गुन्हा शंका पलीकडे सिद्ध झालेला नाही. म्हणून, आरोपीस सदर कलमान्वये निर्दोष मुक्तता देणे हे न्यायसंगत, कायदेशीर व योग्य ठरते.

## <u>आदेश</u>

**१)** आरोपी ज्ञानेश्वर गोविंदा कायंदे याची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ५०४, ५०६ भाग–२ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२)** प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल एक ओबडधोबड दगड हा मुल्यहिन दर्शविला असल्याकारणामुळे अपिलाचा कालावधी पूर्ण

झाल्यानंतर त्यांचा नाश करण्यात यावा.

३) आरोपीचे वैयक्तिक मुचलके व जमानत मुचलके रद्द करण्यात येतात.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या तरतूदींचे अनुपालन केले व त्याअन्वये रुपये १५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तिक व जमानत मुचलका निष्पादीत करून द्यावेत.

५) या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेमार्फत तक्रारदार **ज्ञानेश्वर किशन चाटे, रा. किनगाव राजा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा** यांना पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात मुद्रांकित करून आरोपीच्या उपस्थितीत अधिघोषित केला.)

Digitally signed by SHINDE SATISH GANESHRAO
Date: 2026.03.18 13:10:53 +0530

स्थळः सिंदखेड राजा (सतिश ग. शिंदे)

दिनांकः ११/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदखेड राजा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | श्री. रवि सुभाष सदार (ग्रेड–३) |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिंदखेड राजा |
| दिनांक | – | ११/०३/२०२६ |

सिंदखेड राजा